MHRG010006602026

**फौजदारी जामीन अर्ज क्र. ६६/२०२६ (पेण पोलीस ठाणे गु.र.क्र.११०/२०२६)**

**महाराष्ट्र शासन**

**वि.**

**महेश लक्ष्मण पाटील.**

**जामीन अर्ज निशाणी १ वर आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी पारित आदेश**

१. आरोपी-अर्जदार **महेश लक्ष्मण पाटील** यांचा प्रथमतः केलेल्या जामीन अर्जाचे अवलोकन केले.

२. तपासी अधिकारी श्रीमती शिल्पा वेंगुर्लेकर हयांनी आणि सरकारी वकील- मा. सहा.सरकारी वकील श्री. दिलीप बहिरम यांनी संयुक्तरित्या दाखल केलेल्या खुलासा निशाणी ५ चे अवलोकन केले. तसेच फिर्यादीने नि.क्र.६ अन्वये खुलासा दाखल केला. त्याचे अवलोकन केले. तिच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले.

३. तपासी अधिकारी यांनी आणलेल्या बाइंडींग केलेल्या केस डायरी आणि तपास कागदपत्रांचे तसेच हया अर्जासोबत दाखल केलेल्या निशाणी क्र.१ ते निशाणी क्र.३ (१ ते ५ चे) सुध्दा अवलोकन केले आणि मा. सरकारी विधीज्ञ तसेच तपासी अधिकारी यांनी खुल्या न्यायपीठात नमूद केले की, पिडीता फिर्यादी हिचा भा.ना.सु.स. कलम १८३ अन्वयेचा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अलिबाग यांचेकडे जाब जबाब नोंदवून त्याचा सीलबंद लखोटा प्राप्त झालेला आहे.

४. सध्य परिस्थीतीत अर्जदार आरोपीचे मा. विधीज्ञ श्री. पी.एम. ठाकूर यांचा बर अर्ज युक्तीवाद ऐकला. विशेष करुन त्यांनी सदर प्रकरण उभय पक्ष म्हणजेच फिर्यादी

आणि आरोपी सज्ञान असून मध्यम वयाचे प्रगल्भ आणि परिपक्व असून समाजात जाण, मान आणि लौकीक असलेले व्यक्ती आहेत आणि दोघांच्याही घरी कुटूंबीयांना दोघांचेही असे मैत्रीपूर्ण संबंध माहिती होते व आहेत आणि त्याचे पृष्ठयर्थ त्यांनी निशाणी क्र.८ सोबत कागदपत्र दाखल केले त्यावरुन आरोपी अर्जदार आणि फिर्यादी पिडीता यांच्यामध्ये ८(१) अन्वये दि.१९.०१.२०२२ चा समझोता लेख आहे ज्यामध्ये फिर्यादीने तिचे नाव फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे दिलेले नसून आरोपीचेच नाव पतीचे ठिकाणी लावलेले आहे आणि सदर दस्तऐवज नोटरी केलेला आहे. म्हणजेच उभय पक्ष पूर्ण जाण, भान आणि सहसंमतीने सदर मैत्रीवत आणि पती-पत्नीसम विवाह बाहय नातेसंबंधात समाजात आणि कागदोपत्री सुध्दा राजरोस वावरीत आहे असे दाखविते आणि आरोपी हयाने तिला सोन्याचा हार, फ्रिज, कॉम्पुटर, मोबाईल आणि गाडी घेऊन दिले आहे. तसेच सर्व प्रसंगी विशेष करुन जिल्हयातील सार्वजनिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक आणि अगदी हळदी कुंकवाच्या समारंभात सुध्दा तसेच ऑरकेस्ट्रा, गणेशोत्सव आणि दस्तुरखुद्द आरोपीचे घरी सुध्दा कुटूंबीयांकडून तिचे वाढदिवसा निमीत्त औक्षण, ओवाळणी तसेच उभयंतांचे सहलीला जात असतानाचे पती पत्नीतुल्य फोटो, व्हॉट्सएप वरील स्मरणीकमध्ये इश्क विष्क प्यार व्यार आणि एकमेकांच्या गालाला गाल लावून चुंबन घेणारे आणि अंतरंगी छायाचित्रे आणि त्यातही त्या सर्व छायाचित्रांमध्ये तिची खुललेली मुद्रा यावरुन एक नव्हेतर प्रदीर्घ कालावधीत एकांत आणि सार्वजनिक आणि कौटूंबिक या स्थानी उभयंता पती पत्नी सारखे परस्पर सह संमतीने रहात असल्याचे दिसून येते.

५. त्यातही दस्तुर खुद्द तिच्या फिर्यादीमध्येच तिने नमूद केलेले आहे की, आरोपी त्याच्या पत्नीला घटस्फोट देऊन तिच्याशी लग्न करणार होता. म्हणजेच आरोपी विवाहीत होता याची पूर्ण माहिती तिला होती. तसेच ती आरोपीचे घरी जाऊन आरोपीचे घरच्यांनी आणि वयोवृध्द कुटूंब सदस्यांनी तिच्या वाढदिवसाला तिचे औक्षण केले म्हणून तिला आरोपीच्या घरची सर्व परिस्थीती माहिती होती. म्हणजेच आरोपी लग्न झालेला असून संसारी माणूस आहे आणि दुसरे लग्न केवळ अशक्य आहे तरीही उजळ

माथ्याने सर्व ठिकाणी एक दोनदा नव्हे तर तब्बल २०२२ ते २०२६ पर्यंत रहात फिरत, खात, मिरत आहे. म्हणूनच सदर शारिरिक संबंध असलेतरी हे उभयंतांचे परस्पर सहसंमतीचे आहे असे सकृत दर्शनी दिसून येते. म्हणून फिर्यादीमध्ये तिनेच नमूद केले आहे की, आरोपीची पहिली पत्नी मनिषा पाटील तिचे घरी वारंवार येऊन तिच्याशी भांडण करुन तिच्या पतीपासून लांब राहण्याचे संबंध न ठेवण्याचे सांगत होती. या सर्वांवरुन आरोपी आणि त्याचे पत्नीचा घटस्फोट काही होत नाही हे तिच्या चांगलेच लक्षात आलेले होते आणि तरीही तिने सदर संबंध २०२२ नंतरही अव्याहत ठेवले. म्हणून ते राजी मर्जीचे असल्यामुळे तुर्त तरी बलात्कार या संज्ञेत, या व्याख्येत मोडत नाही म्हणून आरोपी जामीनास पात्र असल्याचे नमूद केले. तसेच असेही नमूद केले की, फिर्यादीतील तथाकथित मजकूर की, २०२१ मध्ये आरोपीच्या त्रासाला कंटाळून उरण येथे गेली. तिथे त्याने जबरदस्तीने गाडीत बसवून कपडे काढले, अश्लील व्हीडीओ बनवला. हे सुध्दा परस्पर विसंगत आहे. कारण जर २०२१ मध्ये अश्लील व्हीडीओ अस्तीत्वात असता तर फिर्यादीने २०२२ नंतर आरोपीशी संबंध ठेवले नसते आणि विशेषकरुन उभयंतांमध्ये २०२२ चा नोटरीपुढील समझोता लेख झाला नसता. एकीकडे आरोपीचे नाव पतीच्या ठिकाणी लावून त्याचेकडून सोन्याचे हार, मोबाईल, गाडया, कॉम्प्युटर घेणे आणि दुसरी कडे त्याने बलात्कार केला असे म्हणजे म्हणजेच सदर आरोपी सकृत दर्शनीसुध्दा किती बिनबुडाचे आहे हे दिसून येते. त्यातही विशेष म्हणजे आरोपी सिध्दी हा पुराव्याचा भाग आहे आणि तुर्त या टप्प्यावर आरोपी जामीनास पात्र आहे की नाही हे ठरविताना पुराव्याची शहानिशा करणे जरुरी नसून त्याचा पुराव्याच्यावेळी उपस्थिती खातीरजमा करणे एवढा उद्देश असतो. तसेच त्याने फिर्यादी आणि साक्षीदारांवर दाब दबाव तंत्राचा वापर करुन त्यांची सुरक्षा अगर पुराव्यात ढवळाढवळ करु नये आणि आरोपी याचे पूर्व गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी एवढेच काय ते विचाराधीन करणे जरुरीचे असते असे निवेदन करुन सरतेशेवटी आरोपी हा नुकताच क्षयरोगग्रस्त झाल्याचे आणि या वैद्यकीय कारणास्तव सुध्दा त्याला जामीनाची नितांत गरज असल्याचे नमूद करुन जामीन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

६. याविरोधी मा. सहा. सरकारी वकील श्री. बहिरम आणि तपास अधिकारी श्रीमती वेंगुर्लेकर तसेच सदर पिडीत महिला हिने व्यक्तीशः सदर अर्जास विरोधी करताना विशेष नमूद केले की, गत दोन वर्षापासून आमच्यात - म्हणजेच आरोपी आणि तिच्यात भांडण नव्हते म्हणजेच २०२४ पावेतो उभयंतांचे सदर संबंध राजरोस सलोख्याचे राहिलेले होते. तसेच ते सहसंमतीचे होते. मात्र दि.१४.०२.२०२६ रोजी त्याची पत्नी आली आणि मला मारहाण झाली असे नमूद केले म्हणजे घटनेचे खरे खुरे कारण उद्देश्य आणि हेतू आरोपीची पत्नी दि.१४.०२.२०२६ रोजी फिर्यादीकडे गेली आणि तिच्या नव-याचा पिच्छा सोडण्यास सांगितले तिथून सुरुवात झाली. म्हणजे त्या आधी राज रोस होते आणि त्यानंतर ते बलात्कारात रुपांतरीत झाले असे नमूद केले आणि सदर व्यक्ती समाजात प्रभावशाली आणि वजन असणारी व्यक्ती आहे म्हणून त्याला जामीन दिल्यास तिच्या जिवाचे बरे वाईट होऊन समाजात तिची अब्रुनुकसानी होईल, पुराव्यात ढवळाढवळ होईल आणि त्याने काढलेले तिचे अश्लील फोटो समाजभर पसरविण्यात येऊन तिच्यावर अघटीत प्रसंग निर्माण होईल म्हणून या सर्व कारणास्तव सदर जामिन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

७. उपरोक्त सर्व अर्ज, खुलासे, शपथपत्र, कागदपत्र, कथन, सर्व पक्षांचे निवेदन, हरकती, युक्तीवाद तसेच विशेषतः प्रथम खबर, छापील प्रमारी तसेच बचाव पक्षाने दाखल केलेले विविधी दस्तऐवज यांचे अवलोकन केले असता बचाव पक्षाचे मा. विधीज्ञ श्री. एम.एम. ठाकूर यांनी उपरोक्त प्रमाणे केलेले निवेदन सकृतदर्शनी रास्त व योग्य असल्याचे आणि उभयंतांचे २०१८ पासून ते आतापर्यंतचे सहसंमतीने पैशा अडक्याने, खांद्याला खांदा लाऊन घरी दारी समाजात, शासकीय आणि सांस्कृतिक कार्यक्रमात पती पत्नीसम वावरणे आणि या ०८ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीमध्ये काढलेल्या ढीगभर फोटोंमध्ये - अंतरंगी फोटोंमध्ये तिची भावचर्या पाहता सदर सहसंमतीच दिसून येते, बलात्कार अगर ब्लॅकमेल दिसून येत नाही. तसेच ती त्याचेसोबत विविध ठिकाणी लोकांचे घोळक्यात व्यासपीठावर नाना प्रकारे वावरते यावरुन सुध्दा त्याने तिला फसवल्याचे किंवा खोटे बोलल्याचे कारणावरुन शरिरसंबंध

केल्याचे तूर्त तरी दिसत नाही. तसेच आरोपी विवाहीत असून त्याची पत्नी फिर्यादीचे घरी येऊन तिच्या नव-याचा पिच्छा सोडण्याचे सांगते हे सुध्दा मान्य करते आणि वरुन समझोता लेख करते, त्याच्याकडून हार, कॉम्प्युटर, मोबाईल, गाडया घेते या सर्वांवरुन तुर्त तरी उभयंतांचे सहसंमतीचे शरिरसंबंध किंवा पती पत्नीतुल्य संबंधात समाजात राजरोस वावरणे दिसून येते. म्हणून आरोपीस या कारणास्तव जामीन मिळण्यास पात्रता व लायकी आहे. विशेष करुन जेव्हा आरोपीचा कुठलाही पूर्व पार्श्वगुन्हेगारी इतिहास नाही. तसेच आरोपी समाजात प्रतिष्ठीत व्यक्ती असून केवळ प्रकरणाच्या धाकाने पळून जाणारा व्यक्तीपण नाही आणि आरोपीने पळून जाऊ नये म्हणून आणि फिर्यादीचे सुरक्षा आणि साक्षीदारांचा पुरावा याच्या ढवळाढवळ करु नये म्हणून न्यायालयास त्याच्यावर सक्त निर्बंध घालण्याची मुभा होती व आहे. सबब या सर्व कारणांस्तव बचाव पक्षाने नमूद आणि विनंती केल्याप्रमाणे प्रस्तुतच्या प्रकरणी आरोपी सशर्त जामीनास पात्र आहे. बचाव पक्षाने जरी आरोपीचे क्षय रोगाचे वैद्यकीय कारणाची सबब पुढे केली आहे तरी ती सबब तुर्त तरी परस्पर विरोधी आहे. एकाच दिवशी एकाच वेळी म्हणजेच दि.३०.०५.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता जेलमध्ये जाण्यापूर्वी आरोपीची वैद्यकीय तपासणी झाली. मग त्याच दिवशी त्याच वेळेला दि.३०.०५.२०२६ ला ०१.०० वाजता आरोपीचे खाजगी डॉक्टरांकडे- निहार नितीन म्हात्रे, पेण येथे तेही वेगळया ठिकाणाला जिथे प्रवासाचे अंतर २ तास आहे तिथे अशी वैद्यकीय तपासणी होऊ शकत नाही. म्हणून जामीनासाठीचे वैद्यकीय कारण पुरेसे आणि सबळ दिसून येत नाही.

८. तथापि उपरोक्त प्रमाणे उभयंतांचे सहसंमतीचे राजरोस शरिरसंबंध, वावर तसेच आरोपी याला पोलीसांनी अटक करुन रितसर पोलीस कोठडी होऊन त्याचेकडून तथाकथित अश्लील फोटो व्हीडीओ जप्तीसाठी पुरेसा वेळ आणि संधी देण्यात आलेली होती व आहे आणि त्यानंतरच त्याला न्यायालयीन कोठडीत घेतले आहे म्हणजेच आता पुढील तपासासाठी त्याची सदेह उपस्थिती अपरिहार्य नाही असे दिसून येते. म्हणूनही त्याचा जामीन अर्ज नाकारुन सुनावणीपुर्व गजाआड डांबणी करता येणार नाही. मात्र फिर्यादी व कुटूंबीय तसेच साक्षीदारांचे सुरक्षा आणि दाबदबाव तंत्र आणि प्रलोभनापासून

मुक्तीसाठी आरोपीवर कडक निर्बंध लादून सशर्त जामीन दिल्यास इपसित साध्य करता येईल आणि साक्षीदारांचे जाब जबाब फिरवण्याची शक्यता देखील विद्वान न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचेकडे भा.नु.सु.सा कलम १८३ चा जबाब नोंदवून पुर्तता झालेली आहे.

९. सबब, या सर्व कारणांवरुन तुर्त आरोपीस जामीन नाकारण्यास कुठलीही बाधा नाही आणि अटी व शर्तीवर त्याचा जामीन अर्ज निम्नानुसार मंजूर करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी महेश लक्ष्मण **पाटील** याचा जामीन अर्ज निम्न अटी व शर्तीवर मंजूर करण्यात येतो.

२. आरोपीने रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार मात्र) चा वैयक्तिक मुचलका (PRB) आणि तेवढयाच रक्कमेचे पात्र स्थानिक जातमुचलका - जामीन कदबा (Local SSB) सादर करावा.

३. आरोपीने बंधपत्र द्यावे की,

I. आरोपी यापुढे न्यायालयीन परवानगी आणि तपासिक अंमलदाराच्या पूर्व संमतीशिवाय जिल्हा रायगड सोडून, महाराष्ट्र राज्य व भारत सोडून विशेषकरुन आठवडयाभरच्या वरचा बाहेरचा दौरा करायचा असल्यास या न्यायालयाच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय महाराष्ट्र राज्य सोडून जाणार नाही. तसेच आणि त्यासाठी हमी म्हणून त्याचे पारपत्र या न्यायालयात तुर्त जमा करेल. तसेच न केल्यास जामिनावर सोडता येणार नाही.

II. आरोपी या पुढे हया किंवा इतर कोणत्याही प्रकारचा कुठलाही गुन्हा करणार नाही आणि शांतता, सुव्यवस्था आणि सलोखा राखेल.

III. आरोपी कुठल्याही प्रकारे फिर्यादी, साक्षीदार, पंच इत्यादी यांच्या दृष्टीक्षेपात पडणार नाही स्वतः किंवा इतरां मार्फत आणि दबाव व प्रलोभन इत्यादी आणून पुराव्यात ढवळाढवळ करण्याचा प्रकार करणार नाही.

४. आरोपीने हयापुढे पेण पोलीस स्टेशनला दर रविवारी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० मध्ये सही नोंदीनिशी हजेरी द्यावी आणि तपासकामी तपासी अधिका-यास पूर्ण सहकार्य करावे. तसेच दोषारोप दाखल करणेकामी न्यायालयाने नमुद दिलेल्या दर तारखेस हजर राहुन दोषारोप करणेकरीता आणि प्रकरण चालविणेकरीता बिनचुक हजर राहिल याची ग्वाही दयावी.

५. आरोपीने असेही बंधपत्र करुन द्यावे की, त्याच्याकडे फिर्यादीचे काहीएक छायाचित्र कुठल्याही प्रकारचे असल्यास तो त्याचा गैरवापर करणार नाही आणि स्वतः किंवा इतरां मार्फत सामाजिक व प्रसार माध्यमांवर टाकून तिची बदनामी करण्याचा तसेच तिची जिवीत, इभ्रत आणि मानहानी करण्याचा कुठलाही थेट अगर अप्रत्यक्ष प्रकार चुकूनही करणार नाही, केल्यास आणि आढळल्यास त्याचा हा जामीन कुठल्याही अधिकच्या आदेशा शिवाय त्याच क्षणी आपसुक रद्द बातल होईल याची दखल घ्यावी.

६. उपरोक्तपैकी एकाही बंधपत्र अटीचे उल्लघन झाल्यास आरोपीचा जामीन सत्वर रद्द बातल होण्यास पात्र राहील याची नोंद घ्यावी.

७. सदर आदेशाची प्रत सदर प्रकरणातील तपासिक अधिकारी यांना माहिती व कारवाईसाठी देण्यात यावी.

SUNITA RAMESHCHANDRA TIWARI

Digitally signed by SUNITA RAMESHCHANDRA TIWARI
Date: 2026.06.10 18:08:18 +0530

अलिबाग.
दिनांक :१०/०६/२०२६.

(श्रीमती. सुनिता तिवारी.)
विशेष न्यायाधीश आणि
अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१,
रायगड-अलिबाग.

**प्रमाणपत्र**

मी याद्वारे पुष्टी करतो की हया पीडीएफ फाईलमधील आदेशामधील सर्व मजकुर मुळ बरआदेश आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : श्री लवेश र. राऊत, लघुलेखक श्रेणी-२ |
| न्यायालयाचे नांव | : जिल्हा व सत्र न्यायालय – १ अलिबाग रायगड |
| आदेशाचा दिनांक | : १०.०६.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी आदेशावर सही केल्याचा दिनांक | :१०.०६.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | :१०.०६.२०२६ |